सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/ 340 दिनांकः- 08 FEB 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष 2021-22 करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत.........मुदतवाढ

संदर्भ :-१) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/विकाना/डीबीटी-पोर्टल/२०२१-२२/३१९६/ दि. १७/११/२०२१ व ३६३६ दि. २३/१२/२०२१
२) मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई , यांचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/विकाप दि. /२०२१-२२ / १८/ दि. ०३ /०२ /२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता, महाडिबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणा-या योजनांच्या लाभासाठी Institute Profile अद्ययावत करण्याबाबत व विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याबाबत तसेच आपल्या लॉगीन ला प्राप्त झालेले अर्ज अटी व शर्तीनुसार तपासणी करून मंजूरीस्तव दि. ३१/०१/२०२० पर्यंत पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले असुन सुद्या डीबीटी पोर्टलवरील डॅशबोर्डनुसार संस्थास्तरावर **एकुण ९, ६२४** विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे निर्दशनास आलेले आहे.

**त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी व मंजूरीस्तव पुढे पाठविण्याकरिता तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील, ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत, अशा विद्यार्थ्यांना , देखील दि. २८/०२/२०२२ पर्यंत Re-Apply करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

तरी , ज्या पात्र विद्यार्थ्यांने अर्ज भरलेला नाही. अशा पात्र विद्यार्थ्याकडून दिलेल्या वाढीव मुदतीच्या आत अर्ज भरून घेण्याबाबतच्या सुचना विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरून देण्यात यावे. तसेच आपल्या लॉगीन मध्ये प्राप्त झालेले अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनांच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/ नामंजूर) करण्यात यावे. अन्यथा मुदतीनंतर संस्था स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज सिस्टीमव्दारे रद्द (Reject) करण्यात येतील. आपण वेळेमुदतीत न केलेल्या कार्यवाहीमुळे लाभार्थी विद्यार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित राहील्यास, याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख यांची राहील., याची नोंद घ्यावी.

**<u>संस्थाकरिता महत्तवाची सुचना:-</u>**

१) विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (MahaDBT Portal ) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल, याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

२) विद्यार्थ्याने एकाच वर्षाकरिता दोन-दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त् करून घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास, याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील. याची नोंद घ्यावी.

(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर